महाराष्ट्र शासन
# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४६०३
**Ph.No** : (०७२१) २५७३०२७, २५७२५७७ **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (०७२१) २५७७९१३

क्रमांक : विकाअ/शिक्षण/स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण/२०२१/ 2309
दिनांक 17 DEC 2021

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व शासकीय, शासन अनुदानीत, विनाअनुदानित तांत्रिक
व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था येथे प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेत सहभाग घेणेबाबत...**

**संदर्भ :** १.मा.उपसंचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण/२०२१/४८२ दिनांक १७ डिसेंबर २०२१
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५ दिनांक ११ डिसेंबर २०२०
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण परीक्षा स्पर्धा मार्गदर्शन/२०२०/२६६ दिनांक १७/१२/२०२०

वरील संदर्भिय विषयानुसार, महाराष्ट्रात असणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जास्त मुलांसाठी फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय सेवा परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाव्दारे स्थापन केलेल्या परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ. सर्व कामे करण्यासाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करु शकणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करण्याबाबत वरील संदर्भ क्र.२ व ३ नुसार आपणास कळविण्यात आलेले आहे.

तरी ज्या संस्थांनी अद्यापपर्यंत समन्वयक यांची नियुक्ती केलेली नसेल त्यांनी तात्काळ समन्वयकांची नियुक्ती करावी. तसेच दिनांक १६.१२.२०२१ रोजी बैठकीदरम्यान मा.संचालक यांनी दिलेल्या निर्देशांनुसार नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या तयारीसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील उमेदवारांची नोंदणी वाढविण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी **मंगळवार दिनांक २१.१२.२०२१ दुपारी २.३० ते ३.३० वाजता** Video Conferencing व्दारा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी आपल्या संस्थामधील समन्वयक (Co-Ordinators) यांनी न चुकता उपस्थित राहावे. याबाबत दैनंदिन नोंदणीसाठी सर्व समन्वयक (Co-Ordinators) कडून रोज माहिती उपलब्ध करुन घेण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र Google Sheet उपलब्ध करुन देण्यात येईल.

बैठकीसाठी Link आपल्या ईमेलवर पाठविण्यात येईल.

**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत: प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.